# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१६ – १७

**संगीतकार मा. अतुल गोगावले यांची सदिच्छा भेट**





हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात अतुल गोगावले यांचा सन्मान करताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, नानासाहेब टाकळकर.

### राजगुरू महाविद्यालयाला गोगावलेंची भेट

राजगुरूनगर : चित्रपट सृष्टीत आघाडीचे आणि प्रयोगशील संगीतकार म्हणून परिचित असलेल्या अजय- अतुल जोडीतील अतुल गोगावले यांनी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयास नुकतीच सदिच्छा भेट दिली. त्यांचे स्वागत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील व उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. संगीतकार अजय- अतुल यांचे काही वर्ष राजगुरूनगरमध्ये वास्तव्य होते. त्यांचे माध्यमिक शिक्षण येथील महात्मा गांधी विद्यालयात तर महाविद्यालयीन शिक्षण हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात झाले आहे. भेटीदरम्यान त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी संस्था अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी महाविद्यालय राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. महाविद्यालयाच्या होत असलेल्या सर्वांगीण विकास, विस्ताराबद्दल गोगावले यांनी आनंद व्यक्त केला. संस्थेच्या माध्यमातून महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेच्या विविध आयोजनाबद्दल त्यांनी संस्थेचे अभिनंदन केले. भविष्यात आपल्यालाही महाविद्यालयाच्या उपक्रमांमध्ये सहभागी व्हायला आनंद वाटेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

केसरी ३ सप्टेंबर २०१६ ५

# अतुल गोगावले यांची राजगुरू महाविद्यालयाला सदिच्छा भेट

राजगुरुनगर (वार्ताहर) : भारतीय संगीतातील आघाडीचे आणि प्रयोगशील संगीतकार म्हणून सर्वपरिचित असलेल्या अजय - अतुल जोडीतील अतुल गोगावले यांनी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयास सदिच्छा भेट देऊन महाविद्यालयाची पाहणी केली. त्यांचे स्वागत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अड. देवेंद्र बुट्टेपाटील व उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले.



राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयास माजी विद्यार्थी व संगीत दिग्दर्शक अतुल गोगावले यांनी सदिच्छा भेट दिली. (छायाचित्र - किरण खुडे)

संगीतकार अजय - अतुल यांनी काही वर्ष राजगुरुनगरमध्ये वास्तव्य केले असून त्यांचे माध्यमिक शिक्षण महात्मा गांधी विद्यालयात तर काही महाविद्यालयीन शिक्षण हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात झाले आहे. या सदिच्छा भेटीत त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत काही वेचक प्रसंग सांगितले. बुट्टेपाटील यांनी महाविद्यालय राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. महाविद्यालयाचा होत असलेल्या विस्ताराबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. संस्थेच्या माध्यमातून महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेच्या यशस्वी आयोजनाबद्दल त्यांनी संस्थेचे अभिनंदन केले व भविष्यात आपल्यालाही महाविद्यालयाच्या उपक्रमांमध्ये सहभागी व्हायला आनंद वाटेल असे आश्वासन त्यांनी दिले.

या प्रसंगी महादेव लिंभोरेपाटील, ॲड. बाळासाहेब लिंभोरेपाटील, सुनील सातकर, महाविद्यालयाचे प्रबंधक कैलास पाचरणे आदि मान्यवर उपस्थित होते.

संध्या रविवार, दि. ४ सप्टेंबर २०१६ ७

# अतुल गोगावले यांची राजगुरू महाविद्यालयाला सदिच्छा भेट

राजगुरु(प्रतिनिधी) : भारतीय संगीतातील आघाडीचे आणि प्रयोगशील संगीतकार म्हणून सर्वपरिचित असलेल्या अजय - अतुल जोडीतील अतुल गोगावले यांनी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयास सदिच्छा भेट देऊन महाविद्यालयाची पाहणी केली. त्यांचे स्वागत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अड. देवेंद्र बुट्टेपाटील व उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. संगीतकार अजय - अतुल यांनी काही वर्ष राजगुरुनगरमध्ये वास्तव्य केले असून त्यांचे माध्यमिक शिक्षण महात्मा गांधी विद्यालयात तर काही महाविद्यालयीन शिक्षण हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात झाले आहे. या सदिच्छा भेटीत त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. या वेळी संस्था अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी महाविद्यालय राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. महाविद्यालयाचा होत असलेला विस्तारावरल त्यांनी आनंद व्यक्त केला. संस्थेच्या माध्यमातून महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेच्या यशस्वी आयोजनाबद्दल त्यांनी संस्थेचे अभिनंदन केले. व भविष्यात आपल्यालाही महाविद्यालयाच्या उपक्रमांमध्ये सहभागी व्हायला आनंद वाटेल असे आश्वासन त्यांनी दिले.



९ ते १५ सप्टेंबर २०१६/२

# खेड टाइम्स

## अतुल राजगुरू महाविद्यालयात

राजगुरुनगर : प्रयोगशील संगीतकार म्हणून सर्वपरिचित असलेल्या अजय-अतुल जोडीतील अतुल गोगावले यांनी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयास सदिच्छा भेट दिली. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील व उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी अतुलचे स्वागत केले. संगीतकार अजय-अतुल यांनी काही वर्ष राजगुरुनगरमध्ये वास्तव्य केले आहे. त्यांचे माध्यमिक शिक्षण महात्मा गांधी विद्यालयात झाले. महाविद्यालयीन शिक्षण हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात झाले आहे.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख